**मा. सह दिवाणी न्यायालय क.स्तर, गेवराई यांचे न्यायालयात**
**नियमित दिवाणी दावा क्र.३९४/२०२१**
**भाउसाहेब व इतर वि. संपत व इतर.**
**निशाणी क्र.२५ वरील आदेश**

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन त्यांच्या विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करुन दाव्याची लेखी कैफियत दाखल करुन घेण्याबाबत दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.१ हे आजारी असल्यामुळे तसेच कोव्हीड—१९ चा प्रादुर्भाव असल्यामुळे ते मा. न्यायालयात हजर राहून लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे सदर प्रतिवादी यांच्या विरुध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करुन प्रतिवादीचे लेखी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन लेखी कैफियत स्वीकारावा अशी विनंती केली आहे.

०३. सदरच्या अर्जावर वादीतर्फे त्यांचे म्हणणे दाखल करुन नमुद केले आहे की, प्रतिवादी जाणुन बुजुन प्रकरण लांबणीवर टाकण्याकामी सदरचे अर्ज देत आहे. प्रतिवादी विरुध्द दिनांक ०७/०४/२०२२ रोजी विना लेखी कैफियतचा आदेश झालेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करावा.

०४. पुढील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात त्यांचेवरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदवित आहे:

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुतचा मंजुर होण्यास पात्र आहे काय? | होकारार्थी |
| २ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |

## :: कारणमिमांसा ::

**मुद्या क्रमांक १ बाबत:**

०५. प्रस्तुतचा अर्ज, वादी व प्रतिवादीचे वकीलांचे म्हणणे व दोन्ही पक्षातर्फे युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांच्याविरूध्द झालेला विना लेखी कैफियतचा आदेश रद्द करून मागितला आहे. वादीच्या वकीलांनी म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुरी बाबत आक्षेप नोंदवला आहे.

०६. प्रतिवादी क्र.१ हे आजारी असल्यामुळे तसेच कोव्हीड—१९ चा प्रादुर्भाव असल्यामुळे ते न्यायालयात हजर होउन लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत ही सदरची कारणे ही संयुक्तीक वाटत असल्या कारणाने तसेच नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजु मांडण्याची पुरेपुर संधी देणे आवश्यक आहे.

०७. सदर उद्भवलेल्या बाबीवरती मा. सर्वोच्च न्यायालयाने Miscellaneous Application No. 665 of 2021 In SMW(C) No. 3 of 2020 IN RE: COGNIZANCE FOR EXTENSION OF LIMITATION या प्रकरणामध्ये कोव्हीड—१९ महामारीच्या पार्श्वभूमीच्या अनुशंगाने होणारा विलंबाच्या बाबतीमध्ये पक्षकार जर वैश्विक महामारीच्या आजारामुळे न्यायालयात कायद्याप्रमाणे विहीत मुदतीमध्ये कार्यवाही करु शकले नाही. अशा परिस्थितीमध्ये या प्रकरणात मार्गदर्शक दिशानिर्देश दिलेले असुन ते उद्भवलेल्या बाबीस तंतोतत लागु पडतात.

०८. प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी तर्फे सदरचा अर्ज देण्यास विलंब झालेला आहे परंतू तो विलंब वादीस योग्य आर्थिक भरपाई दिल्यास वादीचे फार नुकसान होणार नाही. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचु शकते. याउलट प्रतिवादी

क्र.१ यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे आतोनात नुकसान होणार नाही म्हणून प्रतिवादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे करीता सदर मुद्यास मी होकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करिता:**

०९. मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदविल्याने प्रतिवादी क्र.१ चा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करिता मुद्दा क्र. २ च्या उत्तराकरिता खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.१ यांचा अर्ज खालील आदेशाच्या अटीच्या पुर्ततेनंतर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी दंड रक्कम रुपये ३००/— हे भरावे. प्रतिवादी क्र.१ यांनी दंडाची रक्कम जमा केले तर त्यांचे विरुध्द विना लेखी कैफियतीचा आदेश रद्द करण्यात येतो व प्रतिवादी यांना लेखी कैफियत मांडण्याची परवानगी देण्यात येते.

३. दंडाची रक्कम वादीस देण्यात यावी.

SANJAY MOTIRAM GHUGE Date: 2022.04.25 15:50:54 +0530

दिनांक :— २२/०४/२०२२

( एस.एम.घुगे )
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, गेवराई

**(CNR No.MHBI110017412021)**

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original order.

Dictated on : 22/04/2022

Transcribed on : 22/04/2022

Checked & signed on : 22/04/2022

sd./-

Date: 22/04/2022 ( M.L. Rathod )

Stenographer Grade-3, Georai.